**Directorate of Research**
**Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth**
**Akola - 444 104 (M.S.)**

Phone- (O): 0724-2258419

Email: director_res@pdkv.ac.in

**By Email**

No. DR/TK/Jt. Agresco-2022/1414/2022
Date:02/ 12 /2022

**To,**

- **Head, Department of:**
  Agronomy /Agril Botany /Plant Physiology/Soil Science & Agril. Chemistry / Entomology/Plant Pathology /AH & Dairy Sci./ Extension Education/Agril. Econ. & Statistics /Fruit Science/Vegetable Science/ Floriculture & LA/ Forestry/ Agril. Engineering/Soil Water Conservation Engg./Farm Implements & Machinery/Agril. Process Engineering/Farm Structure Engg./Irrigation & Drainage Engg./UCES & EE, Dr. PDKV, Akola
- **Senior Research Scientist:**
  Cotton /Pulses/Oilseeds/ Sorghum/Wheat/ Sugarcane (Tharsa), Dr. PDKV, Akola
- **Associate Director of Research:**
  Zonal Agriculture Research Station, Sindewahi (EVZ)/ Yavatmal (CVZ) / Akola (WVZ)
- **Chief Scientist / Director:**
  Chief Scientist, AICRP on Dryland Agril., Dr. PDKV, Akola
  Director, CRS, Dr. PDKV, Akola
  CSPO, CDF, Dr. PDKV, Akola
  Head, Regional Research Centre, Morshi Road, Amravati (M.S.)
  Chief Agronomist, Integrated Farming System Research, Dr. PDKV, Akola
  Director, Agro Ecology & Environment Centre, Dr. PDKV, Akola
  Dy. Director (Seeds),Dr. PDKV, Akola
- **Officer In-charge, Agriculture Research Station:**
  Washim/ Buldana /Divthana / Achalpur/ Amravati/Yavatmal/ Kutki/ Tharsa/ Ramtek/ Sakoli/ Navegaon Bandh / Amgoan/ Ekarjuna / Sindewahi/Sonapur
- **In-charge, AICRP:**
  Sr. Scientist, AICRP on FIM, Dr. PDKV, Akola
  Sr. Scientist, AICRP on Unconventional Energy Sources, Dr. PDKV, Akola
  Horticulturist, Regional Fruits Research Station, Katol, Dist. Nagpur
  Officer Incharge , AICRP on Medicinal & Aromatic Plants, Nagarjuna, Dr. PDKV, Akola
  Research Engineer, AICRP on PHET, Dr. PDKV, Akola
  Seed Research Officer, Seed Technology Research Unit, Dr. PDKV, Akola
  Senior Scientist, AICRP on Rice Improvement, ARS, Sakoli, Dist: Bhandara
  Soybean Breeder, AICRP on Soybean, Regional Research Centre, Morshi Road, Amravati (M.S.)
  Linseed Breeder, AICRP on Oilseeds Improvement, College of Agriculture, Nagpur
  Senior Scientist & Project Head, AICRP on Agro Forestry, College of Agriculture, Nagpur (M.S.)
  Junior Breeder & Horticulturist, Chilli & Vegetable Research Unit, Dr. PDKV, Akola
  Junior Horticulturist, AICRP on Tropical Fruits (Citrus), Dr. PDKV, Akola
  Agronomist, AICRP on Weed Management, Dept. of Agronomy, Dr. PDKV, Akola
  Sr. Soil Scientist, AICRP on Micro Nutrients / AICRP on LTFE, Dept. of SSAC, Dr. PDKV, Akola

**Subject:** Sending proposal for **"Best Scientist Award"** to be given during Joint Agresco-2022…reg.
**Ref:** No. MCAER/Research/**2735**/2022, Dated: 30/11/2022

With reference to the subject cited, **"Best Scientist Award"** will be given to one scientist from our University during Joint Agresco-2022. In line of this, it is informed to send the furnished proposal of deserving scientist(s) from your Department/Research Unit as per the points given in format for application alongwith supporting documents, coloured photographs etc. in **09 hard copies** to this directorate upto **05/12/2022 till 12.00 pm**.

The copy of letter received from MCAER, Pune along with format of application and procedure of scrutiny is uploaded on University website **www.pdkv.ac.in** for further details.

The proposal received after stipulated date and time will not be considered for scrutiny

**Encl:** Format of application for sending proposal.

Sd/-
**Director of Research**

**Copy to:**

1. The Dean (Agri.) & DI / Director of Extn. Education/Dean (Agril. Engg) / Dean (Hort.) for information.
2. P. A. to the Vice Chancellor for kind information of Hon'ble Vice Chancellor, Dr. PDKV, Akola.

## परिशिष्ठ
## प्रपत्र

| अ.क्र. | तपशिल | कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त परिचय पत्र फोटोसह | |
| २ | शैक्षणिक अर्हता | |
| ३ | अनुभव | तपशिलाच्या पुष्टर्थ असलेली सर्व संबंधित कागदपत्रे अर्जाच्या नमुन्यासोबत जोडावीत. |
| ४ | संशोधन कार्य | |
| ५ | विशेष योगदान | |
| ६ | संशोधक मार्गदर्शक | |
| ७ | विशेष प्रशिक्षण | |
| ८ | विविध शास्त्रीय संस्थांचे आजीव सदस्यत्व | |
| ९ | प्रकाशित केलेली पुस्तके/पुस्तकांमधिल अध्याय | |
| १० | मुख्य किंवा सह संशोधक म्हणून संस्थेसाठी मिळवलेल्या योजना | |
| ११ | पुर्वी मिळालेली बक्षीसे/मान-सन्मान | |

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७**

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : **researchmcaerpune@gmail.com** दूरध्वनी (०२०) २५५२८५७७

जा.क्र.मकृप /संशोधन/प्र.क्र. १२७३५ /२०२२ दिनांक : ३०/११/२०२२

**प्रति,**

**संचालक (संशोधन)**
चारही कृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : चारही कृषि विद्यापीठातून उत्कृष्ट कृषि संशोधकास दरवर्षी होणाऱ्या जॉईंट ॲग्रेस्कोमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करणेबाबत...**

**महोदय,**

वरील विषयास अनुसरून कळविण्यात येते की मा. मंत्री (कृषि) तथा मा. अध्यक्ष, कृषि परिषद यांनी दि. २९.११.२०२२ रोजी सिल्लोड येथील कृषि महोत्सव आयोजन यासंदर्भात झालेल्या बैठकीत प्रत्येक विद्यापीठाने मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने **"एक सर्वोत्कृष्ट कृषि संशोधक"** निवडून जॉईंट ॲग्रेस्कोमध्ये दरवर्षी पुरस्काराने सन्मानित करण्यात यावा असे निर्देश दिले आहेत.

यानुसार आपणांस कळविण्यात येते की, मा. मंत्री (कृषि) आणि मा. प्रधान सचिव (कृषि) यांचे सूचनेनुसार यावर्षी पासूनच सदरचा उपक्रम आपणास राबवावयाचा आहे. तरी या वर्षीच्या दापोली येथील जॉईंट अग्रेस्को पूर्वीच आपण आपल्या विद्यापीठातील एक उत्कृष्ट संशोधकाचे नाव कृषि परिषदेस कळविण्यात यावे. सर्व प्रक्रिया आपल्या विद्यापीठ स्तरावरच करण्यात येऊन दि. ६ डिसेंबर,२०२२ पर्यंत आपण एक नाव कळविणे आवश्यक आहे.

करिता तात्काळ कार्यवाहीस्तव.

**मा. महासंचालक**
**यांचे मान्यतेने**

**(हरिहर कौसडीकर)**
**संचालक (संशोधन)**

**प्रत** : मा. कुलगुरू (चारही कृषि विद्यापीठे) यांना माहितीस्तव व संबंधितांना आदेशास्तव.

4 agri university

# महाराष्ट्र शासन

**कृषि,पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक- कृपु-२०२१/प्र.क्र.४५/४अे,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक- ०३ डिसेंबर, २०२१.

वाचा:-

१. कृषि व पदूम विभाग,शासन निर्णय, क्र.-कृपु-२०२०/प्रक्र.१२/४अे, दि.१२ फेब्रुवारी २०२१.
२. कृषि व पदूम विभागाचे समक्रमांकाचे पत्र क्र.कृभुपु-२०२०/प्र.क्र.१२/४अे, दि.२८ डिसेंबर २०२० व ०३ फेब्रुवारी २०२१.
३. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र क्र.मकृप/संशोधन/५९९/२०२१, १५ मार्च,२०२१.

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्य कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात दरवर्षी शेती व शेती पुरक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यास अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभुषण, जिजामाता कृषिभुषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडीत पुरस्कार, कृषिभुषण (सेंद्रिय शेती ) व कृषि विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार असे पुरस्कार मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.

राज्यातील कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी शेतमाल उत्पादनवाढीमध्ये मोलाचे योगदान देत आहेत. या योगदानाची दखल म्हणून कृषि विभगतील उत्कृष्ठ कामगिरी करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्काराने सन २०१४ पासून सन्मानीत करण्यात येत आहे. या पुरस्कारासाठी पुरस्कारार्थीस सपत्नीक/सपती सन्मानपत्र दिले जाते.

यानुषंगाने कृषि विभागात उत्कृष्ठ कामगिरी करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना दिल्या जाणा-या पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्काराच्या धर्तीवर राज्यातील कृषि क्षेत्रात उल्लेखनीय व नाविण्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या कृषि शास्त्रज्ञांचा पुरस्काराने गौरव करणे आवश्यक वाटते.असा गौरव केल्याने कृषि शास्त्रज्ञांचे मनोबल वाढून कृषि क्षेत्रात नव्या उमेदीने अद्यावत तंत्रज्ञान व नवनवीन वाणांची निर्मिती केली जाईल. कृषि क्षेत्रात उत्पादन वाढीसाठी महत्वपुर्ण ठरणारे उच्च उत्पादान देणारे (HYV) वाण, पिकांवरील किड, रोग व दुष्काळास प्रतिकार करणारे वाण तसेच कृषि तंत्रज्ञान निर्मिती मध्ये कृषि शास्त्रज्ञांचे अनन्यसाधारण योगदान आहे. सबब, कृषि क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणा-या राज्यातील चार कृषि विद्यापिठाचे कार्यक्षेत्रातील प्रत्येकी एका उत्कृष्ट कृषी शास्त्रज्ञास राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत **उत्कृष्ठ कृषि शास्त्रज्ञ पुरस्कार** प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याप्रमाणे शासन पुढिल निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत कृषि क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणा-या प्रत्येक कृषि विद्यापिठाचे कार्यक्षेत्रातील प्रत्येकी एका उत्कृष्ट कृषी शास्त्रज्ञास राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत **उत्कृष्ठ कृषि शास्त्रज्ञ पुरस्कार** प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. **सर्व सामन्य निकष:-**

**अ.** पुरस्कारार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**आ.** सदर पुरस्कारार्थी हा महाराष्ट्र राज्य कृषी विद्यापिठ कार्य क्षेत्रातील शासकीय/खाजगी/सेवाभावी आणि संशोधन, शिक्षण, विस्तार क्षेत्रात कार्यरत असावा.

२. **गुणांकन निकष:-**

राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत **उत्कृष्ठ कृषि शास्त्रज्ञ** पुरस्काराचे गुणांकनासाठी खालीलप्रमाणे समान निकष निर्धारीत करण्यात येत आहेत.

**अ. शैक्षणिक अर्हता (कमाल गुण ५)**

कृषि व संलग्न क्षेत्रातील आचार्य पदवीधर असणे आवश्यक राहील. त्याच्या शैक्षणिक अर्हतेचे गुणांकन खालीलप्रमाणे असावे.

**पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी (PhD) गुणांचे मुल्यांकन खालील निकषाप्रमाणे**

- पदव्युत्तर व आचार्य पदवी दोन्हीही परीक्षांमध्ये विशेष- प्राविण्यात प्रथम श्रेणी असल्यास — ५ गुण (प्रत्येकी).
- पदव्युत्तर व आचार्य पदवी पैकी कोणत्याही एका- ठिकाणी व्दितीय श्रेणी असल्यास — ३ गुण (प्रत्येकी)
- पदव्युत्तर व आचार्य पदवी दोन्हीपैकी कोणत्याही एका- ठिकाणी तृतीय श्रेणी असल्यास — २ गुण (प्रत्येकी)

**आ. अनुभव (कमाल गुण ०६)**

अर्जदाराचा कृषि विद्यापीठ सेवेतील अनुभव लक्षात घेऊन त्याचे गुणांकन खालीलप्रमाणे.

- १५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त अनुभव- — ६ गुण
- १० ते १४ वर्ष अनुभव- — ४ गुण
- ५ ते ९ वर्ष अनुभव- — २ गुण

**टीप-** संशोधकास संशोधन, शिक्षण किंवा कृषि विस्तार यापैकी कोणत्याही एका क्षेत्रात मिळविलेला अनुभव या बाबींसाठी ग्राहय धरण्यात येईल. किमान ५ वर्ष अनुभव प्राप्त असलेला संशोधक पात्र धरला जाईल.

**इ. संशोधन कार्य (कमाल गुण १०)**

शास्त्रीय लेख हे भारतीय कृषि अकॅदमी (NAAS) यांनी मान्य केलेल्या शास्त्रीय नियतकालिकांमध्ये (NAAS Rating ५ पेक्षा जास्त) प्रसिध्द झालेले लेख ग्राहय धरले जातील.

- शास्त्रीय संशोधनात्मक लेखासाठी प्रत्येकी- — १ गुण

**टीप-** संशोधन लेखात प्रथम (प्रमुख) लेखक म्हणुन प्रकाशित असावे तसेच शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्यासाठी प्रसिद्ध केलेले लेख विचारत घेऊ नयेत.(MSc., PhD)

**ई. विशेष योगदान (कमाल गुण २०)**

संशोधनाव्दारे नवीन तंत्रज्ञान / नवीन प्रक्रिया / औजारे विकसीत केले असल्यास या बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

नवीन उत्पादन विकसीत केलेले असल्यास त्या उत्पादनाचा झालेला प्रसार उदा. बियाणे/ कलमे/ रोपे विक्री, नवीन जनावराची जात विकसीत केली असल्यास तिचा झालेला प्रसार या बाबींसाठी स्वामित्व हक्क मिळाले असल्यास (पेटंट) आयबीपीआर / एनबीपीजीआर ला रजीस्ट्रेशन मिळाले असल्यास त्या बाबीचा विशेष विचार करण्यात यावा. त्याचे गुणांकन खालीलप्रमाणे करावे.

- ➢ जॉईट अग्रेस्को मध्ये शिफारस प्राप्त झालेले वाण/तंत्रज्ञान/संयुक्त कार्यपध्दती विकसीत केली असल्यास त्यासाठी प्रत्येकी १ गुण- ५ गुण
- ➢ सदर वाणाचा, तंत्रज्ञानाचा, उत्पादन कार्यपध्दतीचा अथवा संयंत्राचा वापर मोठ्या क्षेत्रावर होऊन पूर्वीचे तंत्रज्ञानात किमान २५ टक्के बदल झाला असल्यास त्यास उर्वरीत पैकी (प्रति वाण/तंत्रज्ञान-१ गुण) ५ गुण
- ➢ अशा उत्पादनाचे/तंत्रज्ञानाचे/संयंत्राचे राष्ट्रीय पातळीवर मान्यता प्राप्त संस्थेकडे नोंदणी व स्वामित्व हक्क मिळाले असल्यास - (प्रति पेटंट ५ गुण) १० गुण

**उ. संशोधक मार्गदर्शक (कमाल गुण-३)**

संशोधकाने पदव्युत्तर व आचार्य स्तरावरील संशोधन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असल्यास त्याबाबतचे गुणांकन खालील प्रमाणे.

- ➢ आचार्य पदवीच्या प्रति संशोधक- २ गुण.
- ➢ पदव्युत्तर पदवीच्या प्रति संशोधक - १ गुण.

**ऊ. विशेष प्रशिक्षण (कमाल गुण २)**

- ➢ ६ महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील संबंधीत क्षेत्राचे विशेष प्रशिक्षण घेतले असल्यास त्यास- २ गुण.
- ➢ किमान २ महिने कालावधीचे राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण घेतले असल्यास त्यास प्रत्येकी- १गुण.

**टिप:** प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र

**ए. विविध शास्त्रीय संस्थांचे सदस्यत्व (कमाल गुण २)**

- ➢ संशोधन क्षेत्रातील संस्थांचे सदस्यत्व धारण केले असल्यास प्रत्येक संस्थेसाठी एक असे जास्तीत जास्त २ गुण

**टिप:** सदस्यत्वाचे प्रमाणपत्र

**ए. प्रकाशित केलेली पुस्तके/ पुस्तकामधील अध्याय (कमाल गुण १५)**

कृषि क्षेत्रातील संशोधन/शिक्षण/विस्तार शिक्षण याविषयी प्रकाशित केलेली पुस्तके किंवा अशा प्रकाशित झालेल्या पुस्तकातील अध्याय याबाबतचे मूल्यांकन खालील निकषाच्या आधारे करावे.

- ➢ पुस्तक प्रकाशीत झाले असल्यास प्रत्येक पुस्तकास- २ गुण
- ➢ प्रकाशीत पुस्तकातील अध्याय - १ गुण

**टिप-** विद्यापीठ प्रकाशने यासाठी पात्र नसतील.

**ओ. मुख्य किंवा सह संशोधक म्हणून संस्थेसाठी मिळविलेल्या योजना (कमाल गुणा १०)**

केंद्र शासन तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांकडून संशोधक ज्या संस्थेत काम करतो त्या संस्थेसाठी नवीन योजना मिळविलेली असल्यास प्रत्येक योजनेस २ गुण अशा योजना मिळविण्यासाठी संशोधक प्रमुख असेल तर २ गुण व सहसंशोधक असेल तर १ गुण राहील.

**टिप:** यासाठी सहभाग असल्याचे संबधित संस्थेचे लेखी (MOU) असावे.

**औ. यापूर्वी मिळालेली पुरस्कार/मान-सन्मान (कमाल २० गुण)**

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यपातळीवरील शास्त्रीय संस्था किंवा शासनाकडून पुरस्कार प्राप्त झाले असल्यास त्याचे मूल्यांकन पुढील निकषाच्या आधीन राहून करण्यात यावे.

- आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार, प्रत्येकी ५ गुण- महत्तम १० गुण
- राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार, प्रत्येकी ३ गुण- महत्तम ०६ गुण
- राज्य पातळीवरील पुरस्कार, प्रत्येकी २ गुण- महत्तम ०४ गुण

**अं. संशोधनाचा विस्तार/नाविन्यपुर्ण उपक्रम-(कमाल ८ गुण)**

- प्रस्तुत संशोधकाने केलेले संशोधन लोकाभिमुख करण्यासाठी केलेल्या उपाययोजना व फलनिष्पती- ४ गुण
- कृषी विद्यापिठाचे उत्पन्नवाढीसाठी संशोधकाने केलेले प्रयत्न व फलनिष्पत्ती - ४ गुण

प्रस्तुत बाबतीत सविस्तर टिपणी देऊन त्याचे मुल्यांकन विद्यापिठ समितीने करुन त्यानुसार गुणांकन करावे.

**अशाप्रकारे एकुण १०० गुण असतील.**

**३. <u>कृषि शास्त्रज्ञ पुरस्कारांची संख्या व स्वरुप :-</u>**

- प्रति वर्ष चार पुरस्कार (चार कृषी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून प्रत्येकी एक उत्कृष्ठ कृषी शास्त्रज्ञ पुरस्कार)
- सपत्नीक/सपती सन्मानपत्र

**४. <u>निवड समिती:-</u>**

**अ.विद्यापीठ स्तरावरील समिती -**

संबंधित विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चार शास्त्रज्ञांची कृषि परिषद शिफारस करेल.

- कुलगुरू अध्यक्ष
- कुलसचिव सदस्य
- अधिष्ठाता (कृषी) सदस्य
- संचालक (विस्तार/शिक्षण) सदस्य
- संबधित जिल्हा मुख्यालयाचे जिल्हाधिकारी सदस्य
- संबधित मुख्यालय जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सदस्य
- संबधित मुख्यालय जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सदस्य
- संशोधन संचालक सदस्य सचिव

**आ. कृषी परिषद स्तरावरील समिती-**

विद्यापीठ स्तरावरील समितीने शिफारस केलेल्या शास्त्रज्ञांमधून प्रत्येक विद्यापीठातून एका शास्त्रज्ञांची अशा प्रकारे एकूण ४ शास्त्रज्ञांची शासनास शिफारस करेल.

- महासंचालक — अध्यक्ष
- संचालक (सा.सा.वि.) — सदस्य
- संचालक (वि.व प्र.,कृषि आयुक्तालय) — सदस्य
- संचालक (शिक्षण) — सदस्य
- सर्व कृषी विद्यापिठाचे संचालक (संशोधन) — सदस्य
- संचालक (संशोधन) MCEAR — सदस्य सचिव

**इ. सचिव स्तरावरील समिती-**

कृषि परिषद स्तरावरील समितीने शिफारस केलेल्या ८ शास्त्रज्ञांपैकी प्रत्येक विद्यापिठातून एकाची शिफारस करेल.

- सचिव (कृषि) — अध्यक्ष
- आयुक्त (कृषि) — सदस्य
- कार्यकारी संचालक (MAIDC) — सदस्य
- संचालक (संशोधन), कृषि परिषद — सदस्य
- उपसचिव (कृषि) — सदस्य सचिव

(बाह्य संस्था पुरस्कृत कार्यरत प्रकल्पाचे संचालक. उदा. पोक्रा, स्मार्ट इ.- सदस्य)

**ई. मंत्रि स्तरीय समिती-**

सदर समितीमार्फत सचिव स्तरावरील शिफारसीनुसार पुरस्कार्थ्यांची अंतिम निवड करण्यात येईल.

- मंत्री (कृषि ) — अध्यक्ष
- मंत्री (फलोत्पादन) — सदस्य
- राज्यमंत्री (फलोत्पादन) — सदस्य
- राज्यमंत्री (कृषि) — सदस्य
- सचिव (कृषि) — सदस्य
- आयुक्त (कृषि) — सदस्य
- .संबंधित उपसचिव (कृषि) — सदस्य सचिव

**५. प्रपत्र:-**

कृषि पुरस्कार अर्ज प्रपत्र परिशिष्टाप्रमाणे:

६. प्रत्येक कृषि विद्यापीठ क्षेत्रातील भौगोलिक कार्य क्षेत्रानुसार संबधित विद्यापिठाचे कुलसचिव यांचेकडे अर्ज करावेत.

७. सर्व कृषि पुरस्कारासाठी प्रत्येक विद्यापिठातून सुयोग्य प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यापिठांचे कुलसचिव तर संनियत्रणाची जबाबदारी संचालक (संशोधन) महाराष्ट्र कृषि संशोधन व शिक्षण परिषद, पुणे यांची राहील.

८. सदर शासन निर्णयातील तरतुदी सन २०२१ पासून विविध कृषि पुरस्कारार्थीच्या निवडीसाठी लागू राहतील.

९.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येत असुन त्याचा संगणक सांकेतांक २०२११२०३१६४०४६०८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SUSHIL DADARAO KHODWEKAR

Digitally signed by SUSHIL DADARAO KHODWEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1c4a8f0aafeac0a009d462f7f02d23942001d76225b9f704de26731171c8684b, pseudonym=3B9A4D2FE6D1E28F48F3C36FFF2083DE6B3E68E5, serialNumber=19B0CCBEE5810AA5E36E9FA467A7630471D3C500CEB353FBB37BF0B6DFE0407A, cn=SUSHIL DADARAO KHODWEKAR
Date: 2021.12.03 16:45:12 +05'30'

**( सुशिल खोडवेकर, भाप्रसे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.मंत्री (कृषि), महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (कृषि), महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई-३२
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र ह (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे /ठाणे
५. कक्ष अधिकारी (संबंधित) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. वित्त विभाग (व्यय-१, अर्थसंकल्प-१३, विनियम) मंत्रालय, मुंबई-३२
७. सचिव, कृषि यांचे स्विय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. उप सचिव (११-अे/फलोत्पादन) यांचे स्विय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व
१०. कृषि संचालक, (सर्व) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
१२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व
१३. तालुका कृषि अधिकारी, सर्व
१४. निवड नस्ती.

## परिशिष्ट

### प्रपत्र

| अ.क्र. | तपशिल | कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त परिचय पत्र फोटोसह | |
| २ | शैक्षणिक अर्हता | |
| ३ | अनुभव | तपशिलाच्या पुष्टर्थ असलेली सर्व संबंधित कागदपत्रे अर्जाच्या नमुन्यासोबत जोडावीत. |
| ४ | संशोधन कार्य | |
| ५ | विशेष योगदान | |
| ६ | संशोधक मार्गदर्शक | |
| ७ | विशेष प्रशिक्षण | |
| ८ | विविध शास्त्रीय संस्थांचे आजीव सदस्यत्व | |
| ९ | प्रकाशित केलेली पुस्तके/पुस्तकांमधिल अध्याय | |
| १० | मुख्य किंवा सह संशोधक म्हणून संस्थेसाठी मिळवलेल्या योजना | |
| ११ | पुर्वी मिळालेली बक्षीसे/मान-सन्मान | |